(इंग्रजी टंकिलिखित न्यायनिर्णयाचे मराठी भाषांतर)

[२०२३] १ एस. सी. आर. ११६९

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ माजी कर्मचारी संघटना आणि इतर ... अपीलार्थी

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य आणि इतर ... उत्तरवादी

(दिवाणी अपील क्रमांक ७७८ **/** २०२३ **)**

फेब्रुवारी ०२, २०२३

[अनिरुद्ध बोस आणि एस. रवींद्र भट, न्या. न्या.]

सेवा कायदा - वेतन सुधारणा – महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना पूर्वलक्षी कट ऑफ (सीमा रेषा) तारखेपासून पाचवा वेतन आयोग लागू करणे, परंतु अंमलबजावणीच्या तारखेपर्यंत सेवेत असलेल्या विद्यमान कर्मचारी यांपुरतेच मर्यादित - पूर्वलक्ष्यी कट ऑफ (सीमा रेषा) तारखेनुसार सेवेत असलेले माजी कर्मचारी (निवृत्त, मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांचे कायदेशीर प्रतिनिधी आणि स्वेच्छानिवृत्ती योजनेचा लाभ घेतलेल्यांसह) परंतु अंमलबजावणीच्या तारखेला नाही, भेदभावाची तक्रार करणारी रिट याचिका दाखल केली - निकाल: कट ऑफ तारखेपासून वेतनसुधारणा देण्याच्या निर्णयाला दोष देता येणार नाही आणि वेतनसुधारणा लागू करण्याचा आदेश जारी करण्यात आला तेव्हा सेवेत नसलेल्यांना कोणतीही वेतन सुधारणा न देणे आणि तो नोकरीत असलेल्यांपुरता मर्यादित ठेवणे, हा स्पष्टपणे भेदभाव

आहे - वेतनसुधारणा केवळ विद्यमान कर्मचाऱ्यांपुरतीच मर्यादित ठेवण्याच्या या उद्देशाशी त्याचा तर्कसंगत संबंध नाही आणि राहणीमानाच्या खर्चात होणारी वाढ कमी करण्यासाठी ही वेतन सुधारणा आहे - त्याच वर्गात पुढील वर्गीकरण करणे हे कलम १४ चे उल्लंघन आहे - नियतकालिन सेवानिवृत्तीने निवृत्त झालेले किंवा सेवेत असताना मरण पावलेले लोक दिलासा मिळण्यास पात्र आहेत - व्ही आर एस (स्वेच्छा निवृत्ती) कर्मचारी आणि सेवेतून काढून टाकलेले / बडतर्फ केलेले समान पातळीवर नाहीत - भारतीय राज्यघटना – कलम १४

भारतीय राज्यघटना – अधिकारांचे विभाजन – धोरण वेतन निश्चिती, सुधारणेची व्याप्ती, अंमलबजावणीची तारीख - केवळ कार्यकारी निर्णय घेण्याच्या अधिकारात - तथापि, व्यापक जनहिताच्या प्रश्नांमध्ये न्यायालयांचे कार्यक्षेत्र निर्माण होते - अंमलबजावणीची पद्धत, योजना लागू करण्याची वेळ, परिणाम, आणि विशेषत: जेथे यामुळे सार्वजनिक कर्मचार् यांच्या काही घटकांना या लाभापासून वगळले जाते किंवा भेदभाव केला जातो (कलम १४).

भारतीय राज्यघटना – वेतनवाढीचे औचित्य - व्यापक जनहित - राज्य आणि सार्वजनिक नियोक्त्यांना किमतीच्या वाढत्या दुष्ट राहणीमानाच्या परिणामांचे वेळोवेळी निराकरण करणे बंधनकारक - इतर उद्दिष्टांमध्ये सार्वजनिक रोजगाराप्रती बांधिलकी आणि निष्ठा वाढविणे, लोकसेवकांना लाचलुचपतीच्या मोहापासून रोखणे - कलम ४३.

अपीलाला अंशत: मान्यता देत न्यायालयाने खालील प्रमाणे निर्णय दिला :

१.१ वेतन निश्चितीसंदर्भात धोरण तयार करणे कर्मचार् यांचे वेतन, त्याच्या पुनरावलोकनाची

व्याप्ती आणि अगदी अंमलबजावणीची तारीख देखील निःसंशयपणे केवळ कार्यकारी निर्णय घेण्याचे अधिकार असलेल्यांच्या अधिकार क्षेत्रात आहे. तथापि, त्याच्या अंमलबजावणीची पद्धत, एखादी योजना लागू करण्याची वेळ आणि त्याचा परिणाम, विशेषत: जिथे यामुळे विशिष्ट वर्ग वगळला जातो आणि सार्वजनिक कर्मचार् यांना लाभापासून वंचित ठेवणे, विशेषत: जेव्हा तक्रार भेदभावाची आणि घटनेच्या कलम १४ च्या उल्लंघनाची असते, जसे सध्याचे प्रकरण आहे , याला न्यायालयाचा चाप हवा. [परिच्छेद १] [११७५- बी सी]

१.२ महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ-एम एस एफ सी ने आपल्या कर्मचार् यांना पाचवा वेतन आयोग (जो राज्य शासनाने दिनांक ०१.०१.१९९६ पासून लागू केला होता) तो स्वीकारायचा की नाही हे निश्चित केले नाही आणि राज्य वित्तीय महामंडळ अधिनियम, १९५१ च्या कलम ३९ नुसार प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला. दिनांक ०१.०१.१९९६ ते ९.०३.२०१० या कालावधीत एमएसएफसीच्या वेतन पटावर असलेल्या सर्व विद्यमान कर्मचार् यांना वेतन सुधारणेच्या अंतरिम सवलतीचा लाभ देण्यात आला. केवळ दिनांक २९.०३.२०१० रोजी, राज्य सरकारकडून प्राप्त पत्राच्या आधारे, एमएसएफसीने केवळ विद्यमान कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना वेतन सुधारणा शिफारशी लागू केल्या आणि फक्त दिनांक १/१/२००६ पासून देय थकबाकी मर्यादित केली . कट-ऑफ तारखेचे कारण (राज्य सरकारने मान्यता दिलेले) "सध्याच्या कर्मचार् यांना एनपीए खात्यांमध्ये जास्तीत जास्त रक्कम वसूल करण्यासाठी प्रेरित करण्यासाठी" होते. लाभ नाकारण्याचे दुसरे औचित्य असे होते की वेतन वेतन सुधारणेत कट-ऑफ तारीख निश्चित करणे हे राज्याच्या

धोरणाच्या कक्षेत येते, ज्यात इतरांसह - राज्याच्या आर्थिक विवंचनेचा समावेश आहे, ज्यात न्यायालयाने हस्तक्षेप करू नये. [परिच्छेद २१-२३, २६] [११८१-एफ-जी; ११८२-ए-सी; ११८६-डी]

१.३ सार्वजनिक अधिकारी आणि कर्मचार् यांच्या वेतनात सुधारणा करण्यासाठी व्यापक जनहित समाविष्ट आहे. वेळोवेळी वेतन सुधारणा करण्यामागचा हेतू म्हणजे वेतन आणि भत्ते सुनिश्चित करण्याने सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचा राहणीमानाचा वाढलेला खर्च आणि सामान्य महागाईच्या प्रवृत्तींशी ताळमेळ बसावा आणि त्याचा कर्मचाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घ्यावी. वेतन सुधारणेत काही इतर उद्दिष्टे सुद्धा अंतर्भूत आहेत , जसे की सार्वजनिक रोजगाराप्रती बांधिलकी आणि निष्ठेची नवीन भावना निर्माण करणे. आणखी एक महत्त्वाचा जनहिताचा विचार म्हणजे, अशा सुधारणा लोकसेवकांना लाचलुचपतीच्या मोहापासून परावृत्त करण्यासाठी आहेत; आपली कामे पार पाडण्यासाठी पैसे किंवा इतर प्रलोभने स्वीकारून त्यांनी त्यांच्या उत्पन्नात वाढ करू नये हा त्यामागील उद्दात हेतू आहे. राज्यघटनेच्या कलम ४३ नुसार सर्व कामगारांना चांगले राहणीमान राखण्यासाठीचे वेतन मिळावे आणि त्यांना चांगले जीवनमान मिळावे, याची खात्री करणे राज्याला बंधनकारक आहे. महागाई भत्त्याद्वारे (जे "स्लाइडिंग स्केल"वर असेल) भाववाढीला आळा घालण्यासाठी यंत्रणा उपलब्ध करून देण्यावर या न्यायालयाच्या मागील निर्णयांमध्ये भर देण्यात आला आहे. सार्वजनिक हिताचा उपाय म्हणून, राज्य आणि सार्वजनिक नियोक्ता, यांनी महागाईमुळे राहणीमानाचा खर्च वाढल्याने व त्यामुळे परिणामी प्रत्यक्ष मजुरीत घट होणे या होणाऱ्या दुष्परिणामांकडे वेळोवेळी लक्ष देणे, हे त्यांचे

कर्तव्य आहे मात्र, वेतन केव्हा आणि किती प्रमाणात वाढवून द्यावे, याचे कोणतेही सरळसोट सूत्र नाही [परिच्छेद २७-२९] [११८६-ई-एच; ११८७-ए-बी; ११८८-सी-डी]

हिंदुस्थान लिव्हर लिमिटेड विरुद्ध बी. एन. डोंगरे

[१९९४] २ एससीआर २१७ : (१९९४) ६ एससीसी १५७ ..... यावर अवलंबून

१.४ लाभ देण्याच्या कट ऑफ तारखेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकत नसले, तरी न्यायालयाच्या अखत्यारीत स्थिरीकरणाचा काय परिणाम होतो आणि त्याचा परिणाम भेदभावात होतो की नाही हे तपासणे हे आहे. राज्य व एमएसएफसीने वेतन आयोगाच्या शिफारशी लागू झाल्यापासून म्हणजे (०१.०१.१९९६) लागू न करण्याचा निर्णय घेतला, परंतु ते त्यांनी एका दशकानंतर म्हणजे दिनांक (०१.०१.२००६) रोजी अंमलात आणण्याचा निर्णय घेतला, आणि दिनांक २९.०३.२०१० रोजी एमएसएफसीच्या हजेरीपटावर असणाऱ्या कर्मचार् यांना देण्यात आलेला लाभ (किंवा थकबाकी) दिनांक ०१.०१.२००६ पासून देय थकबाकीपुरता मर्यादित होता. त्याच वेळी, वेतनाचे फिटमेंट (स्थिरीकरण) आणि निश्चितीकरण १/१/९६ पासून लागू होते. सूत्रामध्ये १/१/९६ पासून नवीन काल्पनिक वेतन श्रेणी निश्चितीची कल्पना केली गेली आहे. त्या फिटमेंट व फिक्सेशनच्या आधारे १.०१.२००६ पासून थकबाकी देय करण्यात आली. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे १/१/१९९६ ते २९/३/२०१० या कालावधीचा, सर्व कर्मचार् यांना अंतरिम दिलासा देण्यात आला होता आणि तो देय करण्यात आला होता आणि तो वसूल केला जाणार नव्हता. यावरून असे दिसून येते की, या तारखांच्या दरम्यान निवृत्त झालेले आणि सेवेत

कायम राहणारे एकाच वर्गाचा भाग आहेत. तसेच ०१.०१.२००६ रोजी सेवेत असलेले परंतु २९.०३.२०१० पूर्वी निवृत्त झालेले आणि त्यानंतर कार्यरत राहिलेले लोक यांच्यातही तफावत नाही. [परिच्छेद ३०-३१] [११८८-ई, एच; ११८९- ए-बी]

१.५ असा प्रश्न उभा राहतो कि २९.०३.२०१० पूर्वी निवृत्त झालेले कर्मचारी वगळून वर्गीकरण केले आहे का,आणि मग हा मर्यादित वेतन पुनरावलोकन लाभ (जरी १/१/२००६ पासून लागू असले तरी) हा भेदभावकारक आहे काय. या न्यायालयाने यापूर्वी ही प्रकरणे फेटाळून लावली आहेत: वनरक्षक पदावर असलेल्यांपैकी केवळ पदवीधरांनाच मर्यादित विभागीय परीक्षेसाठी पात्र ठरविण्याची अट, एका वर्गातच दुसरा वर्ग तयार करण्यासारखे आहे, जे अमान्य आहे (महाराष्ट्र वनरक्षक आणि वनपाल संघ विरुद्ध महाराष्ट्र राज्य);

एका ठराविक कालावधीत निवृत्त होणाऱ्या ज्या शिक्षकांना वेतनवाढ नाकारण्यात आली होती (म्हणजे निवृत्तीच्या तारखेच्या आधारे भेदभाव) हि अगदी मनमानी होती, कारण यामुळे शासकीय महाविद्यालये आणि अशासकीय महाविद्यालयांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांमध्ये भेदभाव होतो असे ज्याचा अर्थ समान घटकाला असमान वागणूक देणे असा होतो (यू. पी. राघवेंद्र आचार्य आणि इतर विरुद्ध कर्नाटक राज्य आणि इतर); पेन्शनच्या सूत्रामुळे होणारे वर्गीकरण ज्यात कट-ऑफ (सीमा रेषा) तारखेपूर्वी निवृत्त होणाऱ्यांना नंतर निवृत्त होणाऱ्यांच्या तुलनेत सुधारित पेन्शनचा कमी दर दिला जात असे, ते भेदभावपूर्ण मानले गेले (ऑल मणिपूर पेन्शनर्स असोसिएशन चे सचिव विरुद्ध मणिपूर राज्य आणि इतर). [परिच्छेद ३२-३५] [११८९-

सी-डी; ११९०-ई-एफ; ११९२-ए-बी]

जम्मू-काश्मीर राज्य विरुद्ध त्रिलोकी नाथ खोसा [१९७४] १ एससीआर ७७१: (१९७४) १ एससीसी १९; महाराष्ट्र वनरक्षक आणि वनपाल संघ वि. महाराष्ट्र राज्य [२०१७] १४ एससीआर ४४६ : (२०१८) 1 एससीसी १४ 9; यू.पी. राघवेंद्र आचार्य आणि इतर वि कर्नाटक राज्य व इतर (२००६) एससीआर 582: (2006) 9 एससीसी 630; सर्व मणिपूर पेन्शनर संघटनेचे सचिव व्ही. मणिपूर राज्य आणि इतर .

[२०१९] 9 एससीआर ९०५ : (२०२०) १४ एससीसी ६२५ - याबावर अवलंबून

१.६ सध्याच्या प्रकरणातही २९.०३.२०१० पूर्वी निवृत्त झालेल्या कर्मचार् यांनी त्यानंतर च्या कर्मचार् यांप्रमाणेच कर्तव्ये पार पाडली हे नाकारता येणार नाही. त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्यांचा दर्जा आणि आशय सारखाच होता. दिनांक १/१/२००६ पूर्वीची थकबाकी न देण्याचा प्रतिवादींचा निर्णय चुकीचा ठरू शकत नाही; मात्र, वेतनवाढीची अंमलबजावणी करण्याचे आदेश जारी करताना सेवेत नसलेल्यांना कोणतीही सुधारणा न देणे आणि त्यांना नोकरीत मर्यादित ठेवणे हे स्पष्टपणे भेदभावपूर्ण आहे. केवळ विद्यमान कर्मचाऱ्यानाच अशी वेतनसुधारणा देणे म्हणजे एमएसएफसीला देय एनपीएची रक्कम वसूल करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे हा आहे, ज्याचा वेतन सुधारणेद्वारे साध्य होऊ इच्छित असलेल्या उद्देशाशी कोणताही तर्कसंगत संबंध नाही, कि जो कर्मचाऱ्यांना फायदेशीर ठरेल आणि राहणीमानाच्या किंमतीतील वाढीपासून त्यांचे संरक्षण करेल. दिनांक २९.०३.२०१० पूर्वी निवृत्त झालेले (किंवा

सेवेत असताना मरण पावलेले) आणि सेवेत कायम राहिलेले - आणि वेतन - सुधारणा देण्यात आलेले लोक, यांच्यात कोणताही फरक नाही. ते, एकाच वर्गात मोडतात आणि त्यांच्यात फरक करता येत नाही. एमएसएफसीने पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार कोणताही दिलेला अंतरिम दिलासा किंवा तदर्थ रक्कम वसूल केली नाही, ही वस्तुस्थिती देखील पुष्टी करते की हे माजी कर्मचारी त्याच वर्गातील होते. दिनांक ०१.०१.२००६ ते २९.०३.२०१० या कालावधीत नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या निवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्त झाले म्हणून वगळणे हे भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ चे उल्लंघन आहे.

१.७ तथापि, ज्या कर्मचाऱ्यांनी व्ही आर एस (स्वेच्छा निवृत्ती) लाभ मिळवले आणि या कालावधीत एम एस एफ सी ची सेवा स्वेच्छेने सोडली, ते वेगळ्या आधारावर उभे आहेत. ज्यांनी सतत आणि निरंतर सेवा केली, आपली कामे पार पाडली आणि त्यानंतर निवृत्त झाले (नियतवयोमानानुसार), त्यांच्या बरोबरीचा दावा, ते करू शकत नाहीत. व्ही आर एस कर्मचाऱ्यांनी महामंडळाची सेवा सोडण्याचा पर्याय निवडला; त्यांना व्ही आर एस ऑफर (पर्याय) फायदेशीर वाटली. त्यांना मिळणाऱ्या सामान्य टर्मिनल लाभांव्यतिरिक्त, त्यापैकी प्रत्येकाला देण्यात आलेली अतिरिक्त रक्कम - सानुग्रह अनुदान रक्कम होती, जी सेवेच्या प्रत्येक पूर्ण वर्षाच्या सेवेस एका महिन्याच्या वेतना इतकी होती. इतर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना एवढी रक्कम कधीच देण्यात आली नाही.[परिच्छेद ३८] [११९५-बी-डी]

ए. के. बिंदल वि. भारत संघ. ए २००३]३ एससीआर 928: (२००३) ५ एससीसी ५६३- वर

अवलंबून

१.८ पूर्वलक्षी कट ऑफ तारीख आणि अंमलबजावणीची तारीख दरम्यान एमएसएफसीच्या सेवेतून निवृत्त झालेले तसेच त्या कालावधीत मृत्यू पावलेल्यांचे कायदेशीर वारस/प्रतिनिधी वेतनवाढीवर आधारित थकबाकीस पात्र असतील. व्हीआरएस कर्मचारी आणि ज्यांना सेवेतून बडतर्फ किंवा काढून टाकले आहे, ते वेतन वाढीच्या लाभासाठी समानतेचा दावा करू शकत नाहीत. [परिच्छेद ३९, ४०] [११९६ -ई-एफ]

केस लॉ संदर्भ

[१९९४] २ पु. एससीआर २१७ परी. २८ वर अवलंबून

[1974] १ एससीआर ७७१ परी. ३२ वर अवलंबून

[2017] १४ एससीआर ४४६ परी. ३३ वर अवलंबून

[2006] २ एससीआर ५८२ परी. ३४ वर अवलंबून

[२०१९] ९ एससीआर ९०५ परी. ३५ वर अवलंबून

२००३] 3 एससीआर ९२८ परी. ३८, ३९ वर अवलंबून

उच्च न्यायालयाच्या मुंबई, नागपूर येथील डब्ल्यूपी क्रमांक १४२० / २०१३, दिनांक 19.06.२०१८ च्या निर्णय व आदेशावरून

जय सावळा, वरिष्ठ अधिवक्ता , सत्या प्रिया राव, नितीन एस.तांबवेकर, शेषताल्पा साई बंडारू, जसदीप सिंग ढिल्लन, ... याचिकाकर्त्यांचे अधिवक्ता .

संतोष पॉल, वरिष्ठ अधिवक्ता ., मैत्रेय शेट्टी, वेदांत मिश्रा, अक्षय पॉल, सचिन पाटील, सिद्धार्थ धर्माधिकारी, आदित्य अनिरुद्ध पांडे, जिओ जोसेफ, रिश्वी मोहम्मद, दुर्गेश गुप्ता,... अधिवक्ता .

उत्तरवादींसाठी

न्यायालयाचा निर्णय यांच्याद्वारे देण्यात आला :

एस. रवींद्र भट, न्या .

१. अपील करण्यासाठी विशेष परवानगी मंजूर. पक्षकारांच्या विद्वान वकिलांच्या संमतीने, अपीलावर सरतेशेवटी सुनावणी झाली.

२. या प्रकरणात काय समाविष्ट आहे, ते म्हणजे उत्तरवादी महामंडळाला पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्यावर त्याची तारीख निश्चित करणे. कर्मचाऱ्यांच्यासाठी वेतन निश्चिती करणे , त्यात सुधारणा करण्याची व्याप्ती आणि त्याच्या अंमलबजावणीची तारीख यासंदर्भात धोरण आखणे, हे निर्विवाद पणे कार्यकारी निर्णय घेण्याच्या अधिकारांचे विषय

आहेत. तथापि, त्याच्या अंमलबजावणीची पद्धत, एखादी योजना लागू करण्याची वेळ आणि त्याचा परिणाम, विशेषत: जेव्हा सार्वजनिक कर्मचाऱ्यांच्या एका विशिष्ट वर्गाला लाभापासून वगळले जाते, हे न्यायालयाच्या तपासणीचे विषय आहेत, विशेषत: जेव्हा तक्रार भेदभावपूर्वक आणि घटनेच्या कलम १४ चे उल्लंघन करणारी असते आणि हे असेच एक प्रकरण आहे.

३. अपीलार्थी संघटना (निवृत्त झालेल्या, व्ही आर एस चा पर्याय निवडलेल्या, राजीनामा दिलेल्या किंवा उत्तरवादी महामंडळाच्या निधन पावलेल्या कर्मचाऱ्यांचे कायदेशीर वारस) मुंबई उच्च न्यायालयाच्या (नागपूर खंडपीठ) निर्णयाला[1] आव्हान दिले. या कार्यवाहीमध्ये अपीलार्थीनीं महाराष्ट्र सरकारच्या (पुढे "राज्य" असे संबोधले आहे) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या २९.०३.२०१० च्या निर्णयाविरुद्ध भेदभाव केल्याची तक्रार केली होती. त्या निर्णयामुळे महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या (पुढे "एम एस एफ सी " असे संबोधले आहे) ०१.०१.२००६ ते २९.०३.२०१० या कालावधीत निवृत्त झालेल्या किंवा मरण पावलेल्या कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतन श्रेणीतील सुधारित लाभ नाकारण्यात आला. राज्याच्या त्या निर्णयामुळे २९.०३.२०१० रोजी कार्यरत असलेल्या एम एस एफ सी च्या ११५ कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाच्या अहवालाचा परिणाम म्हणून वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात आली., मात्र, ही सुधारणा दिनांक ०१.०१.२००६ पासून लागू करण्यात आली.

1दिनांक १९. ६. २०१८ याचिका क्रमांक १४२० / २०१३ मध्ये

४. अपीलार्थींनीं उच्च न्यायालयासमोर विनंती केली होती की, त्यांना वेतनश्रेणीचा लाभ नाकारणे भेदभावपूर्ण आणि मनमानी आहे, कारण ते निरंतर सेवेत होते आणि वेतन आयोगाच्या अहवालानुसार वेतनश्रेणी अंतिम होईपर्यंत त्यांना अंतरिम सुधारणेचा लाभही मिळाला होता. दिनांक २९ / ३ / २०१० रोजी व त्यानंतर नोकरीत असलेले आणि ०१ / ०१ / २००६ नंतर सेवेत कायम राहिलेले परंतु दिनांक २९ / ३ / २०१० पूर्वी सेवानिवृत्त झालेले लोक, एकाच प्रवर्गातील असावेत, असे आवाहन करण्यात आले. जे नंतरच्या तारखेनंतर सेवेत होते त्यांच्यात फरक एवढाच होता की त्यांच्या सेवेचा कालावधी जास्त होता. मात्र, वेतन सुधारणा मंजूर करण्याची महत्त्वाची तारीख म्हणजे ०१.०१.२००६ पासून, ती लागू करण्यात आली. त्या तारखेपर्यंत सर्व याचिकाकर्ते सेवेत असल्याने, त्यांनी काम केलेल्या कालावधीसाठी मान्य केलेली वेतन सुधारणा नाकारणे म्हणजे केवळ शत्रुत्वपूर्ण भेदभावच नव्हे, तर कायदेशीर आणि हक्काने मिळणारे त्यांचे वेतन पुनरावलोकन लाभ, रोखणेच आहे .

५. या वादग्रत आदेशान्वये उच्च न्यायालयाने एम एस एफ सी आणि राज्याचे म्हणणे मान्य केले, की आर्थिक लाभ देण्याबाबत किंवा नाकारण्यासंदर्भात आर्थिक बाबी महत्त्वाच्या आहेत. एम एस एफ सी ने उच्च न्यायालयापुढे विनंती केली होती की, २९ / ३ / २०१० पर्यंत महामंडळाच्या हजेरीपटावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना अधिक चांगल्या कामगिरीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी हा लाभ मंजूर करण्यात आला होता.

६. राज्य सरकारने दाखल केलेल्या प्रतिप्रतिज्ञापत्राला , सुधारणेला मान्यता देण्यात आली आहे,

हा दाखला दिल्यानंतर उच्च न्यायालयाने एम एस एफ सी चा युक्तिवाद मान्य केला : ""...उत्तरवादी क्रमांक २ च्या महामंडळात केवळ ११५ कर्मचारी कार्यरत असून नजीकच्या काळात या कर्मचाऱ्यांची संख्या आणखी कमी होईल, असेही मानण्यात आले. कर्मचाऱ्यांना देय वेतनावर दरमहा १६.०० लाख रुपये खर्च येत होता. प्रतिवादी क्रमांक २ ने सन २००५ पासून कर्ज मंजूर करणे व वाटप करणे बंद केले असून सध्या केवळ आधीच दिलेल्या कर्जाच्या वसुलीचे काम केले जात असल्याचेही निदर्शनास आले.कर्ज वसुलीचे काम करण्यासाठी विद्यमान कर्मचाऱ्यांचे संख्याबळ आवश्यक आहे, याचाही विचार करण्यात आला. सन २००९ - १० साठी निश्चित केलेले कर्ज वसुलीचे उद्दिष्ट लक्षात घेता, वसुलीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कर्मचाऱ्यांना कठोर परिश्रम करण्यासाठी विद्यमान कर्मचाऱ्यांना वेतन सुधारणेचा लाभ देण्यासाठी प्रवृत्त करणे आवश्यक होते. आर्थिक परिणाम लक्षात घेता, कर्मचाऱ्यांची संख्या लक्षात घेऊन उत्तरवादी क्रमांक २ च्या कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, त्याचे उत्पन्न लक्षात घेऊन आणि सर्व संबंधित घटकांचा विचार करून; ५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींवर आधारित वेतन सुधारणा केवळ विद्यमान कर्मचाऱ्यांनाच देण्यात यावी आणि सुधारित वेतनश्रेणी ०१ / ०१ / २००६ पासून लागू करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला. वरील वस्तुस्थिती लक्षात घेतल्यानंतर, वित्त विभागाने वेतनश्रेणीच्या सुधारणेस मान्यता देण्याचा निर्णय घेतला आणि वित्त विभागाने केलेल्या शिफारसीनुसार शासनाच्या शासन निर्णय क्रमांक एसएफसी-२००९ (४२२/उद्योग-७) दिनांक २९/०३/२०१० अन्वये उत्तरवादी क्रमांक २ ला निर्णय कळविला.

त्यानुसार दिनांक २०. ०३. २०१० चा शासन निर्णय जारी करण्यात आला.

६. विशेषत: २९ / ३ / २०१० चा शासन निर्णय हा भेदभाव करणारा आहे आणि याचिकाकर्त्या संघटनेच्या सदस्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करतो हे विशेषत: नाकारण्यात आले. असे सादर करण्यात आले की उत्तर देणाऱ्या उत्तरवादी ने दिनांक १६. ०२. २०१० रोजी, राज्यातील कोणत्याही सार्वजनिक क्षेत्रातील महामंडळाला त्यांच्या कर्मचाऱ्यांना वेतन सुधारणा मंजूर करण्याच्या हेतूने, कोणतेही अर्थसंकल्पीय सहाय्य न देण्याचा धोरणात्मक निर्णय आधीच घेतला आहे. प्रतिवादी क्रमांक २ ही नफा कमावणारी महामंडळ नाही, ही वस्तुस्थिती लक्षात घेता, अशा वेतनवाढीमुळे अतिरिक्त आर्थिक बोजा उचलण्याची विकास भूमिका बजावणाऱ्या प्रतिवादी क्रमांक २ चे आर्थिक परिणाम आणि क्षमता लक्षात घेऊन वेतनवाढीचा प्रश्न विचारात घेण्यात आला. त्याचबरोबर विद्यमान कर्मचाऱ्यांना आधीच वितरित केलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी कठोर परिश्रम करण्यास प्रवृत्त करण्यासाठी वेतन सुधारणा देणे आवश्यक असल्याचेही नमूद करण्यात आले. आर्थिक परिणाम लक्षात घेऊन पुन्हा ०१.०१.२००६ पासून वेतनवाढ लागू करण्यात आली. उत्तर देणाऱ्या प्रतिवादीने घेतलेला निर्णय वस्तुनिष्ठ आणि तर्कशुद्ध विचारांवर आधारित आहे, असे नमूद करण्यात आले.

7. वेतनश्रेणीच्या सुधारणेच्या बाबतीत उत्तरवादी - महामंडळाचे विद्वान वकील श्री पुराणिक अवलंबून असलेल्या निर्णयांमध्ये, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले आहे की कट-ऑफ (सीमा रेषा) तारीख निश्चित करण्यासाठी आर्थिक परिणाम हा संबंधित निकष आहे.

याचिकाकर्त्यांचे विद्वान वकील श्री ढोले अवलंबून असलेले इतर निर्णय हे पेन्शन आणि इतर फायदे देण्याच्या प्रश्नावर आहेत.

8. उत्तरवादी क्रमांक १ आणि २ ने दिलेले औचित्य लक्षात घेऊन, सध्याच्या प्रकरणात 29/3/2010 च्या कट ऑफ तारखेचे निर्धारण अनियंत्रित किंवा तर्कहीन आहे असे आम्हाला आढळत नाही. त्यामुळे आम्हाला याचिकेत काहीही तथ्य आढळत नाही."

अपीलकर्त्यांचे म्हणणे

७. श्री. जय साल्वा, अपीलकर्त्यांचे विद्वान वकील यांनी युक्तिवाद केला की एम एस एफ सी च्या च्या कर्मचाऱ्यांना ०१/०१/१९८६ पासून शेवटची वेतन सुधारणा लागू करण्यात आली होती, शेवटची वेतन सुधारणा ०१/०१/१९८६ पासून लागू करण्यात आली होती, जी ३१/१२/१९८९ रोजी संपली होती आणि एम एस एफ सी ने वेतन सुधारणा १/१/१९९० पासून लागू करण्याचा विचार केला. त्याचा वेतनवाढीचा प्रस्ताव एम एस एफ सी च्या संचालक मंडळाने राज्य सरकारला सादर केला होता. एम एस एफ सी च्या संचालक मंडळाने वेतन आणि भत्त्यांमध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिली आणि सन १९९६ मध्ये तो अंतिम मंजुरीसाठी महाराष्ट्र राज्याकडे पाठविण्यात आला. या सुधारणेला मंजुरी मिळेपर्यंत आणखी पाच सुधारणा प्रलंबित ठेवण्यात आल्या होत्या. त्या सुधारणांचा विचार करण्याऐवजी एम एस एफ सी च्या संचालक मंडळाने वेतन आयोगाच्या शिफारशी ०१.०१.१९९६ पासून मनमानी पद्धतीने लागू केल्या. सुधारित वेतनाचा लाभ संबंधित

वेळी काम करणाऱ्या विद्यमान ११५ कर्मचाऱ्यांनाच देण्यात आला आणि ९०० माजी कर्मचाऱ्यांना त्या लाभापासून वंचित ठेवण्यात आले, मात्र ही सुधारणा त्यांना अनुक्रमे त्यांच्या सेवेच्या कालावधीसाठी लागू होती.

८. अनेक कर्मचारी प्रदीर्घ वर्षांच्या निष्ठेने सेवेनंतर निवृत्त झाल्याने वेतनवाढीचा लाभ देण्यासाठी ची कट ऑफ तारीख मनमानी असल्याचे सांगण्यात आले. एम एस एफ सी ने निवृत्तीनंतर एका फक्त विशिष्ट तारखेला या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला, म्हणून ते कोणत्याही वेतन वाढीच्या लाभापासून वंचित राहतील.

९. राज्य आणि एम एस एफ सी ने एकाच कालावधीत काम केलेल्या आणि आपल्या आदेशानुसार कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्तींमध्ये केवळ त्यापैकी काही निवृत्त झाले आहेत म्हणून, भेदभाव करू नये, असे आवाहन करण्यात आले. अशा प्रकारे, या प्रकरणात तारीख निश्चित करणे मनमानी आहे कारण यामुळे वेतन सुधारणेचा लाभ - जो अन्यथा विशिष्ट कालावधीत काम केलेल्या सर्व कर्मचार् यांना लागू होतो तो या कालावधीत काम करूनही नोकरी बंद झाली आहे या कारणास्तव होत नाही. सन २००० ते २००५ या कालावधीत काम करणारे कर्मचारी हे तथाकथित कट ऑफ तारखेनंतर, म्हणजेच ०१.०१.२००६ नंतर काम करणारे कर्मचारी, असे सर्व एकाच वर्गातील आहेत, असा युक्तिवाद करण्यात आला.

१०. असे सादर करण्यात आले होते की नोकरीत असलेल्या सर्व, ज्यांना शेवटी सेवानिवृत्तीमुळे

वेतन सुधारणेपासून वंचित ठेवण्यात आले होते, त्यांना एम एस एफ सी द्वारे सप्टेंबर, १९९३ पासून (०३.०३.१९९४, २९.४.१९९६, आणि ०७.०९.१९९६) पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार, महाराष्ट्र सरकारच्या निर्देशानुसार तीन अंतरिम सवलती दिल्या आहेत.)

११. पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की सप्टेंबर, १९९३ ते जुलै, २००१ या कालावधीत विद्यमान कर्मचाऱ्यांना दिलेली अंतरिम लाभ रक्कम आणि तदर्थ रकमेची कोणतीही वसुली करण्यात आली नाही (२९ / ३ / २०१० च्या वादग्रस्त शासन निर्णया अंतर्गत) हि गोष्ट पाचव्य वेतन आयोगाच्या शिफारशी ०१.०१.१९९६ पासून लागू करण्यात आल्या हे दर्शविते.

१२. श्री. साल्वा यांनी पुढे असे सादर केले की, माजी कर्मचाऱ्यांसाठीचे एम एस एफ सी चे एकूण दायित्व ₹32 कोटींपेक्षा जास्त नाही, ज्यामध्ये सेवानिवृत्त झालेले ,व्ही आर एस (स्वेच्छा निवृत्ती)घेतलेले किंवा वेतन सुधारणा प्रभावी होण्यापूर्वी मृत्यू झाला होता असे समाविष्ट आहेत. आदेश जारी केल्याच्या तारखेला विद्यमान कर्मचाऱ्यांची संख्या ११४ होती; १३० निवृत्त झाले होते आणि ६३१ जणांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. तथापि, त्या सर्वांना फायदा झाला आणि एम एफ एस सी च्याच आदेशाने 30% पर्यंत अंतरिम सवलत मिळाली. या परिस्थितीत, विद्यमान कर्मचाऱ्यांना एकसंध मोठ्या गटातून बाहेर काढणे, हा नोकरीत नसलेल्या लोकांविरुद्ध प्रतिकूल भेदभाव आहे.

१३. ज्यांनी स्वेच्छानिवृत्तीघेतली त्यांचा कार्यकाळ पूर्ण झाला नाही आणि त्यांना लाभ मिळाला

आहे या कारणास्तव त्यांना वगळता येणार नाही, असा युक्तिवाद करण्यात आला. या संदर्भात श्री. साल्वा यांनी व्ही आर एस योजनेच्या[2] खालील अटींवर (कलम ५) भर दिला.

“ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची स्वेच्छानिवृत्तीची विनंती महामंडळाने स्वीकारली आहे, त्यांना वेतनश्रेणी व भत्त्यांमध्ये सुधारणा केल्यामुळे तसेच वेतनश्रेणीत सुधारणा केल्यामुळे त्यांना मिळणाऱ्या स्वेच्छानिवृत्ती लाभाच्या फरकाची थकबाकी जर का ती महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना मंडळाने पूर्वलक्षी प्रभावाने लागू केले असेल आणि महाराष्ट्र शासन व आयडीबीआयने मान्यता दिली असेल तर मिळण्यास ते पात्र असतील.”

१४. या न्यायालयाच्या निर्णयांवर कर्नल बीजे अकारा (निवृत्त) विरुद्ध भारत सरकार[3], डीएस नाकारा वि. युनियन ऑफ इंडिया[4] वर भिस्त ठेवण्यात आली आणि मग नियोक्ता कट-ऑफ तारखेच्या कृत्रिम उपकरणाद्वारे आणि कर्मचाऱ्यांच्या एकसंध वर्गाची विभागणी करू शकत नाही आणि एका विभागाला वंचित ठेवू शकत नाही व भेदभाव करू शकत नाही, असे आवाहन करण्यात आले.

१५. उत्तरवादी   - राज्य सरकार आणि एम एस एफ सी चे वकील श्री. सचिन पाटील यांनी विनंती केली की संबंधित निर्णयात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही. एम एस एफ सी ही राज्य वित्तीय महामंडळ कायद्यांतर्गत स्थापन झालेली स्वायत्त महामंडळ आहे, असा युक्तिवाद

2एम एस एफ सी च्या कार्यालयीन आदेश क्रमांक १४ दिनांक २९.३.१९९६ द्वारे सादर केले गेले.

3(२००६) ७ पु. एस सी आर ५८ (२००६)११ एस सी सी ७०९
4(१९८३) २ एस सी आर १६५ (१९८३)१ एस सी सी ३०५

करण्यात आला. महाराष्ट्र सरकारी कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या अटी व शर्तींचे पालन करण्यास ते बांधील नाही. किंबहुना कर्मचाऱ्यांच्या वाढीव वेतनामुळे किंवा वेतनवाढीमुळे होणारा अतिरिक्त बोजा किंवा खर्च भागविण्यासाठी स्वतंत्रपणे स्वत:च्या स्त्रोतांतून त्यांना उत्पन्न निर्माण करावे लागते. राज्य वित्तीय महामंडळ अधिनियम १९५१ च्या कलम ३९ अन्वये धोरणात्मक बाबींमध्ये राज्य सरकारचे मार्गदर्शन व निर्देश घ्यावे लागतात, असे सादर करण्यात आले .

१६. असे सादर करण्यात आले होते की एम एफ एस सी आपल्या कर्मचाऱ्यांसाठी चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या वेतन आयोगाच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्याच्या निर्णयास बांधील नाही. वास्तविक, वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचे निर्देश राज्याने महामंडळाला कधीच दिलेले नाहीत तर फक्त २३/९/२०१० च्या पत्रानुसार कॉर्पोरेशनच्या कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींचा लाभ देण्याचा प्रस्ताव दिला. त्यापूर्वी, राज्याने २४/७/१९९६ रोजी संचालक मंडळाने पारित केलेल्या ठरावास मान्यता देण्यास नकार दिला.

१७. पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की अशा वेतनवाढीचा भार सहन करण्याची एम एस एफ सी च्या क्षमतेशिवाय, महामंडळाचे कर्मचारी, हक्काची बाब म्हणून, वेतन सुधारणेच्या कोणताही लाभाचा दावा करू शकत नाहीत. विद्वान वकिलांनी अधोरेखित केले की महामंडळ तोट्यात चालले आहे त्यामुळे अपीलार्थींनीं दावा केलेल्या अटींमध्ये लाभ देण्याचे कोणतेही समर्थन नाही.

१८. असे सादर करण्यात आले की विशेषत: राज्य महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना वेतन, भत्ते आणि इतर फायद्यांच्या सुधारणांच्या संदर्भात कट-ऑफ तारीख निश्चित करणे ही धोरणात्मक बाब आहे. हे विविध गोष्टींवर अवलंबून असतात, ज्यात आर्थिक मर्यादा आणि सहभागी कर्मचाऱ्यांची संख्या समाविष्ट आहे. नियोक्त्याची देय क्षमता हा अशा परिस्तितीत एक महत्त्वाचा आणि वैध विचार आहे, असा मुद्दा कसोशीने मांडण्यात आला. कर्मचाऱ्यांना कोणताही लाभ देण्यासाठी सामान्यतः कट ऑफ डेट निश्चित करणे समाविष्ट असते. या बाबी लक्षात घेतल्यास, महामंडळाच्या हजेरीपटावर असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी मर्यादित पूर्वलक्षी मर्यादा आखून दिल्यास आर्थिक भाराचा परिणाम कमी होतो. अशा प्रकारे, म्हणून सध्याच्या प्रकरणात कट-ऑफ तारखेचे निर्धारण अनियंत्रित नव्हते.

१९. व्ही आर एस ची निवड करून एम एस एफ सी मधून मुदतीपूर्वी निवृत्त झालेल्यांचा दोन्ही पक्षांना, म्हणजे, महामंडळ आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना फायदा झाला पगाराच्या थकबाकीवरील दायित्व कमी करून महामंडळाला फायदा झाला; दुसरीकडे, संबंधित कर्मचारी कोणत्याही योजनेला बांधील नव्हता परंतु नोकरीपासून वेगळे होण्यासाठी स्वतंत्र आणि ऐच्छिक पर्याय त्याने वापरला होता. या कारणांमुळे, अशा कर्मचाऱ्यांना सामान्यत: गोल्डन हँडशेक (पदाचा त्याग करताना कर्मचाऱ्याला मिळणारी रक्कम) म्हटल्या जाणाऱ्या पॅकेजच्या संदर्भात, एक्स-ग्रॅशिया (सानुग्रह) पेमेंटद्वारे सेवा सुरू ठेवली असती तर त्यांनी जे काही कमावले असते त्यापेक्षा जास्त लाभ मिळण्यास ते पात्र ठरले असते. अशी रक्कम इतर सीमा थकबाकीसह

दिल्याने रोजगार बंद झाला; परिणामी, ज्या कर्मचाऱ्यांनी वेतनवाढीसाठी सानुग्रह अनुदानाच्या माध्यमातून लाभ मिळविला त्या कर्मचाऱ्यांचा दावा न्याय्य नव्हता. याचिकाकर्त्या संघटनेची तक्रार ८३५ माजी कर्मचार् यांच्या कारणाशी संबंधित आहे, त्यापैकी मोठ्या संख्येने स्वेच्छानिवृत्तीचा पर्याय निवडलेले आहेत, असे सादर करण्यात आले. त्यांच्याकडून भेदभावाची तक्रार असू शकत नाही. आर्थिक अडचणींव्यतिरिक्त त्या ११५ विद्यमान कर्मचाऱ्यांना वेतनलाभ मर्यादित ठेवण्याचे दुसरे स्वतंत्र औचित्य योग्य आहे, म्हणजेच त्यांना अनुत्पादक मालमत्ता (एनपीए) खात्यांमधून जास्तीत जास्त रक्कम वसूल करण्यास प्रवृत्त करणे, असे सादर करण्यात आले. एम एस एफ सी ला गेल्या काही वर्षांत तोटा सहन करावा लागत असल्याने हा युक्तिवाद समर्पक आहे.

२०. श्री. पाटील, विद्वान वकील न्यायालयाच्या काही निर्णयांवर अवलंबून होते ते पुढीलप्रमाणे,: ए.के. बिंदल आणि दुसरा वि . युनियन ऑफ इंडिया आणि इतर [5]; पंजाब राज्य आणि इतर वि. अमरनाथ गोयल आणि इतर[6] आणि राजस्थान राज्य आणि दुसरा वि. अमृतलाल गांधी आणि इतर[7], कोणत्याही धोरणाची अंमलबजावणी अनियंत्रित आहे की नाही हे ठरवताना नियोक्त्यावरील आर्थिक बोजा हा एक संबंधित घटक आहे ज्याचा न्यायालयाने विचार करणे आवश्यक आहे.

5[२००३] 3 एससीआर 928; (२००३) ५ एससीसी ५६३,

6 ६ [२००५] २ एससीआर ५४९; (२००५) ६ एससीसी ७५४,
7(१९९७) 2 एससीसी ३४२

विश्लेषण आणि निष्कर्ष

२१. वस्तुस्थितीचे बारकाईने विश्लेषण केल्यास असे दिसून येईल की एम एस एफ सी च्या कर्मचाऱ्यांच्या वेतन सुधारणेचा प्रश्न बऱ्याच काळापासून लक्ष वेधून घेत आहे. वरवर पाहता, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी राज्य सरकारने ०१.०१.१९९६ पासून लागू केल्या होत्या. तथापि, एम एस एफ सी ने, आपल्या कर्मचाऱ्यांसाठी ते स्केल (वेतन श्रेणी) स्वीकारायचे की नाही हे अंतिम केले नाही आणि प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला (कलम ३९ अंतर्गत प्रदान केल्याप्रमाणेराज्य वित्तीय निगम अधिनियम). दरम्यान, सर्व विद्यमान कर्मचाऱ्यांना वेतन सुधारणेचा अंतरिम दिलासा देण्यात आला. वेतन सुधारणांसाठी अंतरिम सवलत देणारे यापैकी काही आदेशअभिलेखावर ठेवण्यात आले आहेत. ते आदेश/निर्णय, दिनांक ०३.०३.१९९४ (ऑफिस ऑर्डर क्र. १९१); ०३/०३/१९९४ (ऑफिस ऑर्डर क्र. १९); ११/१०/१९९५ (ऑफिस ऑर्डर क्र. ७३); आणि ७/९/१९९६ (ऑफिस ऑर्डर क्र.६६), चे आहेत आणि जे अपीलंच्या अभिलेखाचाच भाग आहेत. जे कर्मचारी दिनांक १/१/१९९६ ते २९ / ३ / २०१० दरम्यान एम एस एफ सी च्या हजेरीपटावर होते त्यांनी या अंतरिम वित्तीय लाभाचे फायदे स्वीकारले. २९ / ३ / २०१० रोजी, एम एस एफ सी ने पाचव्या वेतन आयोगाच्या वेतन सुधारणा शिफारशी लागू करण्याचा निर्णय घेतला.

२२. विद्यमान कर्मचारी असलेल्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात वेतन सुधारणा प्रभावी करण्याचा आणि ०१ / ०१ / २००६ पासून देय असलेली थकबाकी मर्यादित करण्याचा निर्णय, २९ / ३ /

२०१० [8]रोजीच्या महाराष्ट्र राज्याच्या, पत्रावर आधारित आहे. तो निर्णय सुनावणी दरम्यान रेकॉर्डवर ठेवण्यात आला, तो खालीलप्रमाणे आहे :

"महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एसएफसी २००९/(४२२)

इंड-७ उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक २९ मार्च, २०१०

परिचय:

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळातील कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. यासंदर्भात शासनाने पुढील निर्णय घेतला आहे. शासन निर्णय:

महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळातील कर्मचारी/अधिकारी यांना संलग्न परिशिष्ट 'अ 'च्या स्तंभ क्रमांक ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे खालील अटींच्या अधीन राहून पाचव्या आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यास शासनाने या आदेशाद्वारे संमती दिली आहे.

8निर्णय क्र. एस एफ सी २००९/ (422)/ उ - ७.

१. ५ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन ०१ / ०१ / २००६ पासून महामंडळाच्या सूचीतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना लागू केले जाईल, जे सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' च्या स्तंभ क्रमांक 3 मध्ये नमूद केले आहे.

२. ०१.०१.२००६ पूर्वी सुधारित वेतनश्रेणीमुळे कोणतीही थकबाकी लागू केली जाणार नाही.

३. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाला त्याच्या स्वतःच्या उत्पन्नातून वेतनश्रेणीतील वरील सुधारणांमुळे दायित्वे (पगार आणि थकबाकी) सहन करावी लागेल. त्यासाठी शासन कोणतीही आर्थिक तरतूद करणार नाही.

४. सुधारित वेतनश्रेणीनुसार कर्मचाऱ्यांना नियमानुसार इतर पात्र भत्ते देय असतील.

५. महामंडळाने कर्मचारी संघटनेडून सुधारित वेतनश्रेणीच्या संदर्भात, हमीपत्र प्राप्त करावे.

2. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २३/२०१०/पीयू दिनांक ०५.०२.२०१० नुसार जारी करण्यात आला आहे.

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या नावाने आणि आदेशाने”.

२३. दिनांक ०९/०४/२०१० च्या कार्यालयीन आदेशानुसार, एम एस एफ सी ने महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा आणि त्या तारखेला काम करणाऱ्या महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाचे लाभ देण्याचा निर्णय घेतला.

त्या आदेशामध्येच [9] कट ऑफ तारखेचा आधार का घेण्यात आला, याचे एक कारण आहे आणि हे त्या घातलेल्या अटींवरून स्पष्ट होते, म्हणजे राज्य सरकारने "सध्याच्या कर्मचार् यांना एनपीए खात्यांमधील जास्तीत जास्त रक्कम, वसूल करण्यासाठी आणि त्यासाठी प्रेरित करण्यासाठी" त्या कट-ऑफ तारखेस मान्यता दिली आहे. तो संबंधित परिच्छेद खालीलप्रमाणे आहे:

"महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ मुख्य कार्यालय, मुंबई

एम एस एफ सी /एचओ/ क. आणि प्र. / प्र. / २०१० - ११ / २८, ९ एप्रिल,

२०१०, "<u>कार्यालयीन आदेश क्रमांक १</u>

पुन: महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी पाचव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी

१. महाराष्ट्र शासनाने सध्याच्या कर्मचाऱ्यांना एन पी ए खात्यांमधील जास्तीत जास्त रक्कम वसूल करण्यासाठी, प्रेरित करण्यासाठी दिनांक २९. ०३. २०१० च्या जीआर क्रमांक एसएफसी- २००९ /(४२२)/उद्योग-७ द्वारे उपरोक्त जीआरमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून शासकीय जीआर जारी करण्याच्या तारखेपर्यंत महामंडळाच्याहजेरीपटावर कार्यरत असलेल्या महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

xxxxxx xxxxxx xxxxxx"

२४. वेतन सुधारणेचा लाभ महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आला; त्याचे

9दिनांक ०९/०४/२०१० रोजीचा कार्यालयीन आदेश क्र १

प्रमाण निश्चित करण्याच्या अटी व शर्ती आणि ते ज्या प्रमाणात संबंधित आहेत, त्या लाभांचे अनुदान, खाली प्रमाणे दिले आहे:

"नियम आणि अटी:

